# डी.बी.एफ. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर

## सूचना

कौशल्य विकास अंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर मान्यताप्राप्त कोर्सेस चालविले जातात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना स्वयंम, मूक, एनपीटीएल हे कोर्सेस करण्यासाठी प्रवृत्त केले जाते. त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक धोरणानुसार किमान एक कौशल्य विकसीत करणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टी विचारात घेऊन मागील तीन वर्षापासून महाविद्यालयात अनेक विद्यापीठ मान्यताप्राप्त तसेच कॉलेज रन कोर्सेस शिकविले जातात. हे त्यांच्या नेहमीच्या अभ्यासक्रमासोबत पूर्ण करता येतात. त्याचबरोबर हे कोर्स शिकविण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील अनुभवी तज्ञ, मार्गदर्शक यांची मदत घेतली जाते. या संदर्भात स्वतंत्र महात्मा आनंद स्वामी कौशल्य विकास केंद्र विकसीत करण्यात आलेले आहे. चाळीसपेक्षा अधिक कोर्सेस मधून विद्यार्थी आपल्या स्वतःच्या इच्छेने हवा तो कोर्स निवडून पूर्ण करू शकतो. या कोर्ससाठी महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेले तसेच इतर विद्यार्थी किंवा ज्येष्ठ नागरीक हेही नोंदणी करू शकतात. हा कोर्स कोणत्याही विद्यार्थ्यास बंधनकारक नाही, तो ऐच्छिक आहे.

त्याचप्रमाणे भविष्यामध्ये विद्यार्थ्यांना कोणतीही नोकरी मिळवायची असेल तर स्पर्धापरीक्षेसारखी तयारी करणे अपेक्षीत आहे. हा दृष्टीकोन विचारात घेऊन महाविद्यालयाने मागील चार वर्षापासून अनेक उपक्रम राबविलेले आहेत. जसे वक्तृत्व स्पर्धा, इंग्लिश स्पेलिंग टेस्ट, सायन्स ऑलीम्पीयाड, क्विझ (quiz), Eassy Competitions etc. तसेच एम.पी.एस.सी. च्या धर्तीवर डी.टी.एस.सी. या परीक्षेमधून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी तयार करणे हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेवून एक नवीन पिढी घडविण्यासाठी प्रयत्न केले जातात. या परीक्षादेखील विद्यार्थ्यांना बंधनकारक नसून ऐच्छिक आहेत. विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी भविष्यातील गरजा ओळखून स्वतःला तयार करण्यासाठी आपल्यातील कौशल्य शोधावे व स्पर्धापरीक्षेची तयार करावी.

प्राचार्य

Scanned with CamScanner